Golden Research Thoughts
ISSN 2231-5063

Impact Factor : 3.4052(UIF)
Volume - 5 | Issue - 5 | Nov - 2015

# प्राचीन भारतातील दागदागिने आणि अलकांराची परंपरा ( सिंधू व वैदिक संस्कृती , मौर्य व गुप्त काळ आणि सातवाहन काळ)

**तुकाराम नारायण शिंदे**
**इतिहास विभाग , अे.आर.बुर्ला महिला महाविदयालय ,सोलापूर.**

तुकाराम नारायण शिंदे

**ABSTRACT :**

पुरातन काळापासून भारतीय लोक सांस्कृतिक परंपरा जपत आलेले आहेत.प्राचीन काळात विविध अलंकाराने विभूषित परंपरा भरतीयांच्या दाट परिचयाची होती. प्राचीन भारतात स्त्री व पुरुष स्वत:ला सुशोभित करण्यासाठी अलंकार परिधान करीत असत.दागिन्यांमुळे सुंदरता अधिकच खुलून दिसते. तत्कालिन स्थितीत गरीब लोक साधे चांदीचे ,तांब्याचे आणि पितळेचे दागिने घालत असत आणि श्रीमंत लोक मौल्यवान खडयांचे आणि सोन्याचे दागिने घालत असत. भारतीयांची कलेबद्दलची ओढ आणि विविधरंगी दा□□-यावरील प्रेम दा□दा□□-यां वरून पाहावयास मिळते. याच अनुषंगाने प्रस्तुत ठिकाणी प्राचीन भारतातील विशषत: सिंधू व वैदिक संस्कृती मौर्य व □प्त काळ आणि सातवाहन काळातील दागदागिने आणि अलंकाराची परंपरा □शी होती याचाआढावा घेतला आहे.

## प्रस्तावना

भारतातील लोक जीवनातील भैतिक साधनावर प्रेम □रणारे आहेत. भव्य नगरे , शोभिवंत महाल, दासदासी , □ायक ,नर्तक , अनेक प्रकारच्या वेशभूषा , कपडे , प्रसाधने , चकाकणारे दागदागिने , सुगंधी द्रव्ये ही भारतीय संस्कृती आणि जीवनाची प्रतीक आहेत.याच अनुषंगाने प्राचीन भारतातील सिंधू व वैदिक संस्कृती ,मौर्य व गुप्त काळ , आणि सातवाहन काळात वापरात असलेले अलंकार आणि दागदागिने यांच्या परंपरेचा आढावा प्रस्तुत शोधनिंबधात घेतला आहे.

## प्राचीन भारतीय अलंकार आणि दा□दा□□

"प्राचीन काळापासून मानवामध्ये सौंदया वर्धनाची प्रवृत्ती उपजतच आहे. अशा सौंदर्यवर्धनासाठी अंगावर धारण □लेली मंडन वस्तू म्हणजे अलंकार होय . तसेच प्राचीन काळात दागिन्याला अलंकार ,भूषण , आभूषण असे शब्द प्रचलित होते. 'दा□'या पर्शियन शब्दाचे 'दा□□ा' हे मराठी रूप आहे"[१] प्राचीन काळापासूनच सौंदर्यवर्धनासाठी पुरूषापेक्षा स्त्रीयांनाच अलंकाराबाबत जास्त प्रेम व हव्यास आढळून येतो. तसेच त्यांना सुदर दागिन्यांनी स्वत:ला सुशोभित करायला आवडत होते.त्याचबरोबर प्राचीन काळात पशुधन हीच संपत्ती होती. . वैभव दाखविण्यासाठी दागदागिन्याचा वापर केला जात नव्हता तर शरीर सुशोभित □रण्यासाठी , सौंदर्यवृध्दीसाठीच नखशिखान्त अलंकार परिधान केले जात होते तसेच धर्म व अंधश्रध्दा यामुळेही दागिने परिधान केले जात होते.

"धातूचा शेध लागण्यापूर्वी मानव आपले शरीर रंगवून गोंदवून सजवीत असे. शंख शिंपले , कवडया पाने फुले , वेलींचे देठ, नाना प्रकारच्या बिया , दगड माती , मणी , दात नखे ,अस्थी व केस इ. वस्तू मूळ रुपात किंवा अलंकार रूपात वापरीत असत"[२] पुढे जस-जसा धातूचा शोध लागला तस-तसे निरनिराळे अलंकार बनविण्यास सुरूवात झाली . रत्ने ,तांबे , लोखंड ,सुवर्ण , चांदी यांचा शोध लागल्यानंतर त्याचा वापर अलंकारासाठी मोठया प्रमाणात होऊ लागला होता.प्राचीन काळात प्रामुख्याने खालील प्रकारचे अंलकार परिधान करण्याची परंपरा होती.

१. डोक्यावरील अलंकार
२. □ानातील अलंकार
३. नाकातील अलंकार
४. □ळयातील अलंकार
५. हातातील अलंकार
६. □मरेवरील अलंकार
७. पायातील अलंकार इ.

## सिंधू व वैदिक संस्कृती

प्राचीन भारतातील दागदागिने व अलंकार याबाबत सर्वप्रथम सिंधू संस्कृतीपासून माहिती मिळते. मोहेंजो दडो व हडप्पा येथील स्त्रीया व पुरूष यांना अलंकार परिधान करण्याची हौस असल्याचे दिसते . येथील उत्खननात असे आढळून आले आहे की , "स्त्रिया गळयात ताईत बांधीत व हारही घालीत.दंडात बाजूबंद ,कानात तुकडयासारखी लटकती □र्णभूषणे वापरीत, बांगडया कोपरापर्यंत भरत. त्यांच्या कमरेला मेखला ,बोटात अंगठया व पायात तोरडया असत. याकाळातील श्रीमंताचे दागिने सोने व चांदी व मणी यांचे व गरिबांचे दागिने हे तांबे ,हाडे व शिंपा यांची असत"[३] "मोहोंजो दडो येथील मातीच्या स्त्रीच्या चित्रात वेगवेगळया प्रकारचे □मरपट्टे दिसून येतात. यामध्ये कांही साधे आहेत तर □ांही मण्यांचे आहेत"[४] मोहोंजो दडो येथे पुरूष वापरत असलेला भूजबंद सापडला आहे. तसेच याकाळातील पुरूष मनगटापासून ते दंडापर्यंत अकरा वर्तुळे घालत. अशी वर्तुळे हडप्पा व मोहोंजो दडो येथे सापडली आहेत. "मोहोजों दडो येथील स्त्रिया पायात पैंजण घालत असत. याच प्रकारची पैंजण आज भारतीय स्त्रिया घालतात."[५]

वैदिक काळातील अलंकार व दागदागिने याचीही महिती मिळते. " नाटयशास्त्र ग्रंथात स्त्रियांनी डोक्यावरील जे दागिने वापरत त्याचे प्रकार सांगितले आहेत ते म्हणजे चुडामणी , शिरसजल , मुक्ताजल , पिंडपत्र , वर्तलालतिका आणि ललाटिकातिलक हे प्रकार होय. यापैकी वर्तलालतिका व ललाटिकातिलक हे अलंकार कपाळावर वापरत असावेत"[६]तसेच

याकाळात कर्णशोभना किंवा हिरण्यकर्ण या नावाचे कर्णफूल स्त्रिया वापरत असत.

### मौर्य काळ व गुप्त काळ

"मौर्य काळात कुंडल ,मोठी माला , छातीवर रूळणारी तीन पदरी माळा , कटक(अंगठी) , हातासाठी आणि बाहूसाठी अंगद हे अलंकार प्रकार अधिक प्रमाणात वापरात होते" [७] □ीटिल्याने आपल्या ग्रंथात अनेक प्रकारच्या □ठाहाराचा उल्लेख केला आहे. " यामध्ये शीर्षक, उपशीर्षक , प्रककांडक , अवघटक , तरलप्रतिबंध , इंद्रच्चंद्र , विजयचंद , अर्धहार , रश्मिकल्प , गुच्छ , नक्षत्रमाला , अर्ध गुच्छ मनोवका , अर्ध म-नोव□ा ,शुध्दहार , त्रिफळक , पंचफलक किंवा फलकाहार , एकावली वसती , रत्नावली , अपवर्तक आणि सोपनक या प्रकारचे कंठाहार सुवर्णाध्यक्षाच्या निरीक्षणाखाली बनविले गेले . यापैकी तरलबंध , शीर्षक , अपशीर्षक , अवघटक आणि प्रकाकांडक हे सर्व मोत्यांचे कंठाहार होते. तर इंद्रच्चंद्र हा दागिना बहुतेक १००८ मोत्यांच्या सरीचा कंठाहार होता[८]"

□ुप्तकाळात मोत्यांचे दागिने अधिक प्रमाणात वापरले जात होते. याकाळात कानासाठी कर्णफूल हा अलंकार प्रचलित होता. गळयात हार , मणिमाला धारण करत तर हातामध्ये बाजूबंद , बांगडया व कंगण घातले जात होते. याशिवाय गुप्तकाळात कमरपट्टा पायात विछुआ(जोडवी) व पैंजण हे अलंकार प्रचलित होते.[९] यासर्व अलंकारापैकी हसळी हा दागिना फार प्राचीन होता. पुरातन काळात मोठी माणसही गळयात हासळी घालत . आर्थिक स्थितीनु सार सोने □वा चांदी या धातूची नाणी यासाठी वापरत असत.

### सातवाहन काळ

सातवाहन हा महाराष्ट्राचा पहिला ऐतिहासिक व भारताचे साम्राज्य संपादन करणारा महावंश होय. सौंदर्यप्रसाधने , अलंकार व दागदागिने याबाबतीत सातवाहनकालीन लोक फार रसिक होते असे समकालीन शिल्पे , गाथासप्तशती ग्रंथ आणि पैठण, नाशिक , नेवासे , तेर , दौलताबाद , पितळखोरा , येथील उत्खलित अवशेष आणि सातवाहनकालीन लेण्या यावरून दिसून येते.सातवाहनकाळातील प्रामूख्याने मणीमाला,कर्णभूषणे आणि काकणे याप्रकारचे अलंकार सापडले आहेत. " सातवाहनकाळात कपाळावर बिंदी , भांगेतून मोक्तिकमाला , गळयात एकावली , कानात कर्णकुंडले ,भूजांवर बाजूबंद, हातात वलये , कमरेवर मेखला , पायात वलये आणि नुपूरे तसेच मातीची आणि शंखाची कर्णफूले ,काचेच्या गोल चकत्या , काजळ ठेवण्याकरिता दगडाच्या संगजिऱ्यांच्या डब्या , शंकाची हरतऱ्हेची नक्षी असलेल्या बांगडया काजळ डोळयात घालण्याकरिता हस्तिदंत आणि हाडांच्या शलाका , विविध प्रकारचे उत्कृष्ट बनावटीचे दगडांचे ,शंखाचे काचेचे व मातीचे मणी इ. इलंकार मोठया प्रमाणात वापरत होते"[१०] तेर येथील उत्खननात २३५ बांगडयाचे तुकडे मिळाले आहेत .या बांगडया तांबे ,काच , शंख व मणी यापासून बनविल्या आहेत. या बांगडयावर सुंदर नक्षी दिसून येते.[११]

सातवाहन राजा हाल याने लिहिलेल्या □ाथासप्तशती ग्रंथात अनेक प्रकारच्या अलंकाराचे उल्लेख आहेत. यामध्ये प्रामुख्याने मुकुट , कौस्तुभ ,□□□ □डदोरा ,कुण्डल ,हार ,कंठिका , जालवलय नुपूर या अलंकाराचा समावेश होतो[१२]. औरंगाबाद येथील ले□ामधून " टपोरे मणी, दंडावर अलंकार , कुंडले व मेखला असून मस्तकावर शिरस्त्राने धारण केलेल्या सुंदर मूर्ती आढळतात" तर पितळखोरेमधील स्त्रीने चौकोणी मण्यांचा सहा ओळींचा कंबरपट्टा घातला आहे. [१३] डॉ. एम.के. ढवळीकर लिखित ' अजिंठा -ए-□ल्चरल स्डडी'□ाथात सातवाहनकालीन अलंकाराची झालरपट्टी केसात घालावयाचे साधे अलंकार की , जी तारेत गुंफलेली मण्यांची किंवा रत्नाची माळ याचा उल्लेख केला आहे.[१४]

याशिवाय भारतात कांही ठिकाणी अलंकाराची निगडीत अंधश्रध्दा वा अंधविश्वास दिसून येतो. उत्तर भारतात जेव्हा एखादा पुरूष दुसऱ्यांदा लग्न करतो तेव्हा त्याच्या दुसऱ्या पत्नीने सोने किंवा चांदी या धातूच्या पत्र्यामध्ये सदर पुरूषांच्या पहिल्या पत्नीची प्रतिमा बसविलेला दागिना वापरणे आवश्यक होते. अन्यथा पहिल्या पत्नीचा आत्मा / भूत तिला छळेल अशी अंधश्रध्दा होती . तर महाराष्ट्रात आजही ही सवतीची पुतळी (प्रतिमा) वापरली जाते.[१५]

### सारांश

एकूणच सिंधू संस्कृतीपासून ते सातवाहन काळापर्यंतचे अलंकार व दागदागिने यांचा अभ्यास केल्यास ते परिधान करण्यामधील सातत्य टिकून राहिल्याचे दिसून येते. अलंकाराचे आकार व नाव यामध्ये बदल झाला असला तरी त्याच प्रकारचे साचेबंद पध्दतीचे अलंकार प्रत्येक कालखंडात वापरात असल्याचे दिसते . आज अलंकार कमी वजनाचे झाले असले तरी तशाच प्रकारचे कमी वजनाचे अलंकार वा दागदागिने प्रसंगानुरून वापरले जातात.

### तळटिपा


१. डॉ.सौ. दीपा दिनेश सावळे ,मराठेकालीन दागदागिने आणि अलंकार,कैलाश पब्लिकेशन्स औरंगाबाद पृ. □.११
२. संपा.तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी ,मराठी विश्वकोश , खंड -१ मुबई पृ.क्र.५१५
३. संपा. पं. महादेवशास्त्री जोशी ,भारतीय संस्कृती कोश १ पुणे ,पृ.क्र. २४६
४. सचिदानंद सहाय , इंडियन कस्टम , कॉइफर ॲन्ड ऑर्नामेंट पृ.क्र. १४३
५. सचिदानंद सहाय पृ.क्र. १४४
६. सचिदानंद सहाय पृ.क्र. १५५
७. डॉ. इंदूप्रभा पांडेय ,ड्रेस ॲन्ड ऑर्नामेंट इन इन्सेंट इंडिया पृ.क्र.११४
८. सचिदानंद सहाय ,पृ.क्र. १२२
९. ले. श्रीमती अन्विता आनंद , गुप्त काल मे नारियों की स्थिती , दिल्ली १९६२ पृ.क्र.८३
१०. शां.भा. देव ,महाराष्ट्रातील उत्खनने ,दिल्ली १९६८ ,पृ.क्र.५५
११. संपा.बी.एन. चाफेकर , तेर उत्खननातील अहवाल ,पृ.क्र. ९१
१२. डॉ.सौ. दीपा दिनेश सावळे , मराठकालीन दागदागिने आणि अलंकार पृ.क्र. २५
१३. तत्रैव पृ.क्र. २७,३१
१४. डॉ. ढवळीकर ,अंजटा -ए - □ल्चरल स्टडी , पूणा १९७४ पृ.क्र.६२
१५.डॉ.सौ.दीपा दिनेश सावळे ,मराठेकालीन दागदागिने आ□ि अलंकार पृ.क्र